**सार्वजनिक आरोग्य संस्थांच्या बांधकामासाठी हुडको या वित्तीय संस्थेकडून प्राप्त झालेल्या कर्जाची परतफेड करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- हुडको-२०२५/प्र.क्र.३१३/पासु-२**

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल आवार,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१.
दिनांक:- २४ ऑगस्ट, २०२६.

वाचा:

१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. HUDCO-२०२१/C.R.२४३/Arogya-३ दि.१९.०१.२०२२.
२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र.हुडको-२०२५/प्र.क्र.३१३/पासु-२, दि.०१.१२.२०२५
३) हुडको या वित्तीय संस्थेचे पत्र क्र. एच/एमआरओ/मांग/३४८/२०२६/३३८, दि.०४.०८.२०२६.

**प्रस्तावना:**

राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागातंर्गत मंजूर आरोग्य संस्थांच्या बांधकामासाठी हुडको या वित्तीय संस्थेकडून रु. ३९४८.०० कोटी कर्ज घेण्यासाठी ३ वर्षांचा अधिस्थगन कालावधी आणि त्यापुढे १० वर्ष परतफेडीचा कालावधी तसेच इतर अटी व शर्तीसह दिनांक २१.१२.२०२१ रोजीच्या मा. मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानुषंगाने संदर्भाधीन अ.क्र. १ अन्वये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीत चालू व नवीन आरोग्य संस्थांच्या बांधकामासाठी हुडको या वित्तीय संस्थेकडून कर्ज उपलब्ध करुन घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार हुडकोकडून सार्वजनिक आरोग्य संस्थांच्या बांधकामासाठी अद्यापपर्यंत रु.२३८१.६३ कोटी इतके कर्ज उपलब्ध करुन घेण्यात आले असून उर्वरीत कर्ज उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही चालू आहे. तसेच हुडकोकडून प्राप्त झालेल्या कर्जाची माहे नोव्हेंबर, २०२५ पासून परतफेड सुरू झालेली आहे. हुडको या वित्तीय संस्थेकडून प्राप्त झालेल्या कर्जाची मुद्दल भरण्याचे वर्षामध्ये ४ टप्पे आहेत. दर तीन महिन्याने मुद्दल भरण्यात येते. त्यामध्ये फेब्रुवारी, मे, ऑगस्ट व नोव्हेंबर अखेर पर्यंत मुद्दल भरण्यात येते. उपरोक्त संदर्भाधीन अ.क्र.२ अन्वये हुडकोकडून प्राप्त झालेल्या कर्जाची परतफेड करण्याच्या अनुषंगाने देयके तयार करुन ते अदा करण्यासाठी या विभागातील कक्ष अधिकारी (रोख शाखा) यांना आहरण व संवितरण अधिकारी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई (डी.डी.ओ.कोड ७१०१००२३०५) यांना प्राधिकृत करण्यात आले असून उप / सह सचिव (रोखशाखा) सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणुन घोषित करण्यात आले आहे. त्यानुषंगाने हुडकोकडून घेण्यात आलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी रु.९८.७० कोटी (अक्षरी रुपये अठ्ठ्यान्नव कोटी सत्तर लक्ष फक्त) इतकी मुद्दल रक्कम हुडको या वित्तीय संस्थेस अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

सार्वजनिक आरोग्य संस्थांच्या बांधकामासाठी हुडकोकडून उपलब्ध करुन घेण्यात आलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी उपरोक्त संदर्भाधीन अ.क्र.३ अन्वये हुडकोकडून प्राप्त झालेल्या मागणीपत्रानुसार रु.९८.७० कोटी (अक्षरी रुपये अठ्ठ्यान्नव कोटी सत्तर लक्ष फक्त) इतकी मुद्दल रक्कम हुडको या वित्तीय संस्थेस अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. हुडको या वित्तीय संस्थेकडून आरोग्य संस्थांच्या बांधकामासाठी घेण्यात आलेल्या कर्जाची परतफेड करण्याच्या अनुषंगाने सदर संस्थेस अदा करावयाची रक्कम जमा करावयाच्या खात्याची सविस्तर माहिती खालील प्रमाणे आहे:-

| | | |
|---|---|---|
| “Name of Beneficiary | : | Housing and Urban Development Corporation Limited |
| Bank Name | : | STATE BANK OF INDIA |
| Beneficiary Virtual A/C No | : | 00000036015854586 |
| IFSC Code | : | SBIN0017313” |

३. हुडकोकडून प्राप्त झालेल्या कर्जावरील मुद्दल अदा करण्यासाठी येणारा खर्च सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी विभागाच्या मुख्य लेखाशिर्ष मागणी क्र. आर-३, ००,१०९- इतर संस्थांकडून मिळालेली कर्ज, (०१) (०१) (०२) आरोग्य संस्थांचे श्रेणीवर्धन व बांधकामासाठी हुडकोकडून घेतलेले कर्ज (अनिवार्य) ५६, कर्जाची परतफेड (६००३ ०४९४) अंतर्गत मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६ नुसार सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये अनिवार्य खर्चाकरीता निधी वितरणास दिलेल्या मान्यतेस अनुसरुन अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८२४१११७०७३२१७ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KAVITA PRADIP PISE

Digitally signed by KAVITA PRADIP PISE
DN: cn=KAVITA PRADIP PISE, o, ou, email=kavita.pise@nic.in, c=IN
Date: 2026.08.24 13:13:15 +05'30'

**( क. प्र. पिसे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र- १/ २ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
४. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखाधिकारी, मुंबई.
६. उप/सह सचिव, अर्थसंकल्प, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

७. उप/सह सचिव, रोख-शाखा, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

८. आहरण व संवितरण अधिकारी तथा कक्ष अधिकारी (रोख शाखा), सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई.

९. कार्यासन अधिकारी (अर्थबळ) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

१०. सह संचालक, आरोग्य सेवा (रुग्णालय राज्यस्तर), आयुक्तालय, मुंबई.

११. निवडनस्ती (पायाभूत सुविधा-२).